(इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचे मराठी भाषांतर)

[ २०२३ ] ५ एस.सी.आर. ९१८

सक्तवसुली संचालनालय, भारत सरकार

वि.

कपिल वाधवान आणि इतर

(फौजदारी अपील क्रमांक ७०१ - ७०२ / २०२० )

मार्च २७, २०२३

**[के. एम. जोसेफ, हृषिकेश रॉय आणि बी.व्ही. नागरत्ना, न्या. न्या.]**

*फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ : कलम १६७ (२) परंतुक (अ) (२) - डिफॉल्ट बेल ( वैधानिक जामीन / कसुरमुलक जमीन ) – दावा – ६० / ९० दिवसांच्या कोठडीचा कलम १६७ (२) मधील तरतुदीनुसार - ज्या दिवशी दंडाधिकारी कोठडीचा आदेश देतात त्या दिवसाची गणना करणे किंवा तो दिवस वगळणे - निकाल: कलम १६७(२) आरोपीला कोठडी देण्याच्या दंडाधिकाऱ्यांच्या अधिकाराशी संबंधित आहे आणि दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयाने त्यांच्या न्यायालयाच्या नजरानीत सदर आरोपी असल्याची तारीख वगळण्याचे कोणतेही कारण नाही. असा निर्णय देण्यात आला कि : - ६०/९० दिवसांच्या कालगणनेमध्ये कलम १६७ अन्वये कोठडी दिलेल्या तारखेकडे दुर्लक्ष केल्यास संथ गतीने होणाऱ्या तपासाच्या कारणास्तव आरोपीला दीर्घकाळ कोठडीत राहण्यापासून विधिमंडळाचा संरक्षण देण्याचा हेतू विफल होईल. – कलम १६७ अन्वये*

*निर्धारित केलेल्या ६० / ९० दिवसाची, रिमांड (कोठडीच्या ) कालावधीची गणना दंडाधिकाऱ्यांनी रिमांड (कोठडी) मंजूर केल्याच्या तारखेपासून केली पाहिजे - अशा प्रकारे, ज्या क्षणी विहित ६० / ९० दिवसांच्या कोठडीची मुदत संपते त्याच क्षणी, आरोपींना डिफॉल्ट ( वैधानिक जामीन ) मिळण्याचा अक्षम्य अधिकार प्राप्त होतो - वस्तुस्थितीनुसार आरोपींना १४/५/२०२० रोजी कोठडी सुनावण्यात आली होती आणि त्याप्रमाणे आरोपपत्र १२/०७/२०२० (म्हणजे साठव्या दिवशी) किंवा त्यापूर्वी दाखल व्हायला हवे होते - पण ते कोठडीच्या ६१ व्या दिवशी दाखल झाले - त्यामुळे आरोपींना डिफॉल्ट ( वैधानिक ) जामिनाचा अधिकार ६१ व्या दिवशी मध्यरात्री १२.०० वाजल्यानंतर मिळाला. - त्याच दिवशी आरोपीने डिफॉल्ट ( वैधानिक ) जामीन अर्ज दाखल केला - ई डी ने नंतर त्यादिवशी आरोपपत्र दाखल केले, - अशा प्रकारे, दोषारोपपत्रापूर्वीच डिफॉल्ट ( वैधानिक ) जामीन अर्ज दाखल करण्यात आला - अशा प्रकारे, जर ६१ व्या /९१ व्या दिवशी किंवा त्यानंतर आरोपपत्र / अंतिम अहवाल दाखल केल्यास आरोपी डिफॉल्ट ( वैधानिक ) जामिनास पात्र असतो - उच्च न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहितेमधील कलम १६७ (२) मधील परंतुक (अ ) (२); अवैध आर्थिक व्यवहार प्रतिबंधक कायदा, २००२, कलम ३ च्या आधारावर दिलेल्या जामीनाचे समर्थन केले आहे.*

*कलम १६७(२) - कोठडीचा दिवस समाविष्ट करून/वगळून ६०/ ९० दिवसांच्या कोठडीच्या कालावधीची गणना करण्याबाबत परस्परविरोधी मत - कलम १६७ (२) (अ) च्या तरतुदी अन्वये विहित ६०/९० दिवसांच्या कालावधीची गणना करणेबाबत रुस्तमच्या खटल्यात*

*छगंती च्या खटल्यातील बंधनकारक संहितेकडे दुर्लक्ष केले आणि अशा प्रकारे रुस्तमच्या खटल्याखातल्यातील निर्णय अयोग्य मानला जातो.*

*न्यायालयीन पूर्वदाखल्याचा सिद्धांत : कायद्याच्या तरतुदींचा योग्य विचार न करता दिलेला न्यायनिर्णय - याचा नियम - असा निर्णय देण्यात आला की :न्यायीक उदाहरणाच्या सिद्धांताला अपवाद आहे - यात अशी तरतूद आहे की जेव्हा एखादा निर्णय संबंधित उदाहरण किंवा इतर कोणत्याही बंधनकारक प्रामाण्याच्या अज्ञानामुळे दिला जातो, तेव्हा तो स्वयंसिद्ध चुकीचा कायदा आहे असे म्हटले जाते - सुरुवातीच्या मताचा निर्णय आधार घेऊन भिन्न मतांमुळे उद्भवणारा संघर्ष सोडविणे समर्पक ठरते.*

*जनरल क्लाजेस ॲक्ट (सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ ) : ची लागूता , कलम १६७(२) (अ) अन्वये दिलेला ६०/९० दिवसांचा कालावधीची गणना करते समयी – असा निर्णय देण्यात आला कि कलम १६७ ला सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम लागू होत नाही, कारण निर्धारित कोठडी कोणत्या 'कधीपासून' सुरू होऊ शकते हे निश्चित नाही.*

**या संदर्भात उत्तर देताना न्यायालयाने खालील प्रमाणे निर्णय दिला : १.१ बंधनकारक प्रामाण्याच्या नियमात अशी तरतूद आहे की कायद्याच्या तरतुदींचा योग्य विचार न करता दिलेला न्यायनिर्णय हा न्यायिक प्रामाण्य सिद्धांताला अपवाद आहे. खरेतर यात अशी तरतूद करण्यात आली आहे की, जेव्हा एखादा निर्णय संबंधित पूर्वदाखाल किंवा इतर कोणत्याही बंधनकारक प्रामाण्याच्या अज्ञानात दिला जातो, तेव्हा तो चुकीचा कायदा आहे असे म्हटले जाते. सुरुवातीच्या**

मताचा निर्णयाचा आधार घेऊन भिन्न मतांमुळे उद्भवणारा संघर्ष सोडविणे यथे समर्पक ठरते. [परिच्छेद ३०] [९३८-डी-ई]

१.२ छगंती या प्रकरणाच्या बाबतीत असा निर्णय देण्यात आला की ९० / ६० दिवसाचा कालावधी हा कलम १६७ (२) मधील परंतुक (अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोठडीच्या तारखेपासूनच मोजण्यात येतो आणि तपासाच्या उद्देशाने ९० / ६० दिवसांची कोठडी देण्याचा विधिमंडळाचा मानस असल्याचे दुरुस्तीद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. असे स्पष्ट मत व्यक्त केले गेले कि एकूण कोठडीच्या कालावधीच्या संदर्भात परंतुक (अ) मधील तरतुदीचाच साध्या भाषेचानुसार अर्थ असा आहे कि जणू काय ती एक संपूर्ण संहिताच आहे आणि मग याच धर्तीवर त्याचा अर्थ लावला जातो आणि पुढे सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम किंवा मुदत अधिनियमातील तरतुदींचा वापर करणे पूर्णपणे अनावश्यक आहे. एम. पी. ( मध्यप्रदेश ) राज्य विरुद्ध रुस्तम प्रकरणात कलम १६७ (२), (अ) मधील तरतुदी मध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीत कोठडीची तारीख वगळण्यात यावी, असे मत व्यक्त करण्यात आले. रुस्तमचं प्रकरण वाचल्यावर असे लक्षात येतं कि कालावधीची गणना करताना न्यायालयाने सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमाच्या कलम ९ आणि १० चा विचार केला आहे. परंतु तसे करताना रुस्तम या प्रकरणामध्ये न्यायालयाने छगंती प्रकरणामध्ये घालून दिलेल्या गुणोत्तराची दखल घेतली गेलेली नाही, कारण या प्रकरणामध्ये हे स्पष्टपणे निर्देशित केले गेले आहे की कलम १६७ (२) अंतर्गत कालावधी मोजणीच्या उद्देशाने, सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमातील तरतुदी लागू होणार नाहीत. कलम १६७ (२) आणि परंतुक (अ) यामागील विधिमंडळाचा कायदेविषयक हेतू लक्षात

घेता सदरची तरतुद ही स्वत:च एक संपूर्ण संहिता आहे आणि रुस्तम प्रकरणात मांडलेली गणना पद्धत योग्य मार्ग असू शकत नाही आणि हे छगंती प्रकरणामध्ये स्पष्ट केले आहे. पुढे कलम १६७ (२) च्या परन्तुक (अ) अन्वये दंडाधिकाऱ्यांनी कोठडीचे आदेश दिल्यापासून ६०/९० दिवसांच्या कालावधीची मोजणी करण्याबाबत छगंती या खटल्यातील बंधनकारक उदाहरणाकडे दुर्लक्ष करून, रुस्तम च्या प्रकरणामध्ये निर्णय देण्यात आला आणि तो कायद्याच्या तरतुदींचा पूर्ण विचार न करता दिलेला न्यायनिर्णय आहे. त्यामुळे रुस्तमच्या खटल्यातील ६०/९० दिवसांच्या मोजणीच्या कालावधीसंदर्भात आलेला ऑपरेटिव्ह (प्रवर्ती ) भाग, सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमाच्या कलम ९ आणि १० वर अवलंबून जिथे न्यायालयाने कोठडीची तारीख वगळली आणि छगंती या प्रकरणातील विपरीत मताकडे दुर्लक्ष केले, आणि म्हणून हे आता न्यायालयीन बंधनकारक पूर्वादाखाला असू शकत नाही कारण तो पूर्ण विचारांती दिलेला न्यायनिर्णय नाही [परिच्छेद २६, २८, २९, ३१] [९३७- डी-एफ, जी-एच; ९३८-ए-सी; ९३९-बी-सी]

१.३ कलम १६७ मध्ये, तपास पूर्ण करण्यासाठी प्रारंभ किंवा शेवटसाठीचा बिंदू नाही. सी आर पी सी, कलम १६७ च्या उपकलम (१) मधील तरतुदी, उपकलम (२) च्या अनुषंगाने अखंडपणे पुढे सलग आहेत. दंडाधिकारी यांच्या समोर आरोपी याला अटकेच्या अनुषंगाने एक पुढची प्रक्रिया म्हणून पोलीस हजार करतात त्याचवेळी आरोपीचा सुद्धा अटकेनंतर २४ तासांच्या आत दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करूनघेण्याचा अधिकार आहे. ज्या दिवशी आरोपीला दंडाधिकाऱ्यांसमोर रिमांडवर हजर केले जाते, त्या दिवशी दंडाधिकाऱ्यांना त्या दिवसाची गणना करून पोलीस - कोठडीत पाठविले जाते किंवा त्याला कायम ठेवून किंवा दंडाधिकारी कोठडीत

ठेवण्याचा अधिकार कलम १६७ च्या उपकलम (२) नुसार देण्यात आला आहे. येथे दोन प्रक्रियांमध्ये विराम / ब्रेक असू शकत नाही. कलम १६७ मध्ये परिसीमनाच्या संकल्पनेचा विचार नाही किंवा तपास पूर्ण करण्यासाठी आणि दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी कोणतीही मुदत मर्यादा नसल्यामुळे 'फ्रॉम' (पासून ) आणि 'टू' (पर्यंत) या मर्यादेच्या कालावधीत ते बसवता येत नाही. दंडाधिकाऱ्यांच्यासमोर हजर होणे ही एक अटकेनंतरची सलग प्रक्रिया आहे आणि दंडाधिकारी १५ दिवसांपर्यंतच पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देऊ शकतील परंतु पुरेसे कारण उपलब्ध असल्याचे समाधान झाल्यास दंडाधिकारी १५ दिवसांपेक्षा अधिक काळ पोलिस कोठडी व्यतिरिक्त इतर ठिकाणी डांबण्याचे आदेश देऊ शकतील. विशेष म्हणजे, पोलिस किंवा तपास अधिकाऱ्यांनी अगदी नेमका कोणत्या बिंदुला तपस पूर्ण करावा असा कोणताही मापदंड नाही. मात्र, तपास पूर्ण न झाल्यास आणि पुढे ६० किंवा ९० दिवसांत दोषारोपपत्र दाखल न केल्यास आरोपीला डिफॉल्ट ( वैधानिक / कसूर झाल्यामुळे) जामिनाचा अधिकार मिळतो. रिमांड पूर्वीचा पोलिसांच्या ताब्यात असलेला कोठडीपूर्वीचा कालावधी म्हणजे कोठडीत डांबणे नव्हे आणि दंडाधिकाऱ्यांनी अधिकृत केलेल्या कालावधीपासूनच ते असते. [परिच्छेद ३४] [९३९-एच; ९४०-ए-ई]

१.४ दंडाधिकाऱ्यांनी आदेश दिलेल्या दिवसापासूनच डांबून ठेवण्याच्या कालावधीची कालगणना सुरु होते. सी आर पी सी चे कलम १६७ उपकलम (२) हे आरोपीला कोठडी देण्याच्या दंडाधिकाऱ्यांच्या अधिकाराशी संबंधित आहे आणि आरोपी, ज्या दिवशी दंडाधिकारी कोर्टाच्या नजरानीखाली असतो, ती तारीख वगळण्याचे काहीच कारण नाही. केवळ निवांतपणे तपास केला

जात आहे या कारणास्तव आरोपीला दीर्घकाळ तुरुंगवास होऊ नये म्हणून आणि जर आरोपी जमानतपत्र देण्यास तयार असेल तर आरोप पत्र वेळेत दाखल करण्यास कसूर झालेच्या कारणास्तव जमीन मिळण्याचा अधिकार त्याला विधिमंडळाने बहाल केलेला आहे आणि यापुढे सुद्धा तपास चालू राहू शकतोच. म्हणूनच सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम कलम १६७ उपकलम ( २ ) साठी हे लागू पडत नाही. तसेच कोठडी आदेशाची तारीख वगळल्यास कलम ५६ अन्वये अटकेच्या तारखेपासून सुरू होणारी आणि कलम १६७ अन्वये निर्धारित ६० / ९० दिवसांच्या कालावधीपर्यंत सुरू राहणारी आरोपीच्या कोठडीतील सातत्यता जी कलम ५६ प्रमाणे अटकेच्या तारखेपासून सुरु झाली आहे ती सुद्धा खंडित होईल. याउपर जेव्हा रिमांड ऑर्डरची ( कोठडीत डांबून ठेवण्याचा आदेश ) तारीख निर्धारित रिमांड कालावधीचा पहिला दिवस म्हणून समाविष्ट केली जाते, तेव्हा आरोपीला कोठडीसाठी निश्चित ६० दिवसांचा कालावधी नसतो. एकदा का दंडाधिकारी यांनी रिमांड मंजूर केल्यावर, मग तो वेळ काहीही असो, कारण मग असे केल्यास, प्रत्येक प्रकरणात फिर्यादी पक्षाला कलम १६७ (२) च्या तरतुदी (अ) (२) अंतर्गत समाविष्ट गुन्ह्यांसाठी ५९ दिवस आणि २३ तास किंवा ५९ दिवस आणि १ तास किंवा त्यापेक्षा जास्त काळ अशा वेगवेगळ्या बिंदूंपर्यंत वेगवेगळ्या पैलूंप्रमाणे कोठडीचा कालावधी वेगवेगळा असेल. आरोपीच्या कोठडीचा नेमका कालावधी दंडाधिकारी कोर्टाच्या पहिल्या नजराणीवर आणि रिमांड (डांबून ठेवण्याच्या) च्या आदेशावर स्वाक्षरी करण्यावर अवलंबून असतो हे छगंती यांच्या प्रकरणातील निष्कर्शावरून स्पष्ट होते कि सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम कलम १६७ सी आर पी सी साठी लागू नाही, कारण निर्धारित कोठडी कोणत्या कालावधी पासून किंवा निश्चित

'कधीपासून किंवा कोणत्या घटकेपासून' सुरू होते याचे निश्चितीकरण कठीण आहे. शिवाय, कोठडीची तारीख समाविष्ट आहे आणि विहित कालावधीतून वगळली जात नाही, ही वस्तुस्थिती व्यक्तीच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर आधारित आहे की कायद्याच्या विशिष्टतेतील कोणत्याही त्रुटीचा अर्थ हा आरोपीच्या बाजूने लावावा लागेल. [परिच्छेद ३४] [९४०- ई-एच; ९४१-ए-सी]

१.५  कलम ५७ सी आर पी सी नुसार आरोपीला अटकेनंतर २४ तासांच्या आत दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करणे बंधनकारक आहे आणि कलम १६७ (२) अन्वये न्यायदंडाधिकाऱ्यांनी नोकरशाही शासन व्यस्थेच्या कारवाईची छाननी करणे आणि आरोपींचे अधिकार पोलिसांच्या कारवाईच्या प्राबल्ल्याखाली आहेत का किंवा कसे याची शहानिशा करणे आवश्यक आहे. कार्यकारी आणि न्यायालयीन अधिकारांचा वापर, याचे पृथक्करण शेवटी एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे रक्षण करते जे अनुच्छेद २१ आणि २२ (२) अंतर्गत घटनात्मकदृष्ट्या संरक्षित केलेले आहे. दंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या कोठडीच्या तारखेकडे दुर्लक्ष केल्यास आरोपी कोठडीत असूनही ६०/९० दिवसांच्या कालखंडासाठी त्याची गणना केली जाणार नाही. कलम ५६ सी आर पी सी अंतर्गत आरोपीला अटक करणे व कोठडी सुनावण्याच्या तारखेचा आरोपीचा असलेला ताबा ह्या दोननही गोष्टी वेगळ्या आहेत कारण तो दंडाधिकाऱ्यांसमोर हजर होण्यापूर्वीचा कालावधी मानला जातो. या तर्कानुसार, आरोपी जरी कोठडीत असला तरी तो कलम ५६ अन्वये, किंवा १६७ (२) सी आर पी सी अंतर्गत आहे असे मानले जाणार नाही. यामुळे कायदेशीर पोकळी निर्माण होईल. रिमांड ऑर्डरच्या दिवसापासूनच रिमांड कालावधीचा विचार केल्यास हे टाळता येऊ शकते. शिवाय, जर एखाद्या आरोपीला

दंडाधिकाऱ्यांनी जर दिनांक १/१/२०२३ रोजी कोठडी सुनावली असेल तर न्यायालयीन छाननीनंतर सी आर पी सी कलम १६७ नुसार पोलिसांना त्याच दिवशी तपास सुरु करण्याचा अधिकार आहे आणि पोलिसांनी खरोखर त्याच दिवशी तपास सुरू केला की नाही याची पर्वा करण्याची गरज नाही. मग आता जर पोलीसना कोठडीच्या आदेशाच्या दिवशीच आरोपी व्यक्तीची चौकशी करण्याचा अधिकार असला तर मग ६०/९० दिवसांचा निर्धारित कालावधी, ज्याची मुदत संपल्यावर आरोपीला कसूर केल्याच्या कारणास्तव जामिनाचा अधिकार मिळतो आणि त्याची तार्किक गणना त्या दिवसापासूनच करावी. ६०/९० दिवसांच्या कालावधीकडे कोठडीच्या तारखेकडे दुर्लक्ष केल्यास कलम १६७ सी आर पी सी अंतर्गत विधानमंडळाने आरोपीला ढिसाळ तपासामुळे दीर्घकाळ कोठडीत राहण्यापासून जे संरक्षण पुरवण्याच्या कायदेशीर हेतूचा घाट घातलेला आहे त्याच्या हे अगदी विरोधात जाते. [परिच्छेद ३६] [९४१-ई-जी; ९४२- ए -सी]

१.६ ६० / ९० दिवसांची मर्यादा ही एक वैधानिक आवश्यकता आहे जी राज्य यंत्रणांना १५ दिवसांच्या पोलिस कोठडीपलीकडे गंभीर गुन्ह्यांचा तपास करण्याची परवानगी देते. विहित ६०/९० दिवसांच्या मुदतीत राज्याने दोषारोपपत्र दाखल केले नाही किंवा कोठडीसाठी पुरवणी विनंती न केल्यास, व्यक्तीचे अधिकार आणि त्या अधिकारांवरील निर्बंध यांच्यात समतोल साधला पाहिजे आणि कायदेशीर आधाराशिवाय दीर्घकाळ तुरुंगवास टाळला पाहिजे. वैधानिक कोठडीची मुदत संपताच आरोपीला कसूर झाल्याबद्दल जामिनाचा शून्याकारणीय नसलेला अधिकार मिळतो आणि त्याचे रक्षण करणे आवश्यक आहे. व्यक्तीचे स्वातंत्र्य निश्चितच सापेक्ष

आणि नियंत्रित असते. निरपेक्ष स्वातंत्र्य ही अशी गोष्ट आहे ज्याची कल्पना सामाजिक वातावरणात करता येत नाही त्यामुळे आरोपींना ताब्यात घेण्याची मुभा कायद्याने अधिकाऱ्यांना दिली आहे आणि तपासाची सोय केलेली आहे. मात्र, दीर्घकाळ तुरुंगात राहण्यापासून परावृत्त करणे, हे या न्यायालयाचे कर्तव्य आहे. आरोपपत्र उशिराने दाखल करून कसूर झालेच्या कारणास्तव जामिनाचा अधिकार संपुष्टात येत नाही तर तो अधिकार पुढे कायम राहतो. [परिच्छेद ४२] [९४४-सी-ई]

१.७ जेव्हा कोठडी आदेशाचा दिवस विहित कालावधीमध्ये समाविष्ट केला जातो तेव्हा कलम १६७ (२) अन्वये अभियोग पक्षाला सी आर पी सी चे कलम ५७ अंतर्गत दिलेल्या तरतुदींचे त्वरेने पालन व पूर्तता करण्यास प्रोत्साहित केले जाते. आरोपीच्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकाराकडे झुकून ६० दिवसांचा कालावधी कमी करणे आणि तो ५९ दिवस आणि काही तास आहे हे कलम २२ (२) आणि कलम २१ अन्वये आरोपीला देण्यात आलेल्या घटनात्मक संरक्षणावर आधारित आहे. अशा प्रकारे, एखाद्या आरोपीच्या संदर्भात निर्णय घेताना संहितेचा वापर हे वैयक्तिक स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेच्या अनुल्लंघनीय अधिकाराशी सुसंगत असायला हवे. [परिच्छेद ४८] [९४७- सी-डी]

१.८ सी आर पी सी च्या कलम १६७ च्या वापरामध्ये आणि तपशीलांमध्ये पोकळी अस्तित्वात असल्याने त्यामध्ये समाविष्ट असलेल्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे उद्दिष्ट स्वीकारले जाते. आरोपींना १४/५/२०२० रोजीकोठडी सुनावण्यात आली होती, त्यामुळे दोषारोपपत्र दिनांक १२/०७/२०२० रोजी (म्हणजे साठवा दिवस) किंवा त्यापूर्वी दाखल व्हायला हवे होते. परंतु ते

दिनांक १३/०७/२०२० रोजी म्हणजेच त्यांच्या कोठडीच्या ६१ व्या दिवशी दाखल केले गेले. त्यामुळे आरोपींना, सदरची कसूर केल्याने, जामिनाचा अधिकार दिनांक १३.०७.२०२० रोजी मध्यरात्री १२.०० वाजता पासून मिळाला. त्याच दिवशी सकाळी ८ वाजून ५३ मिनिटांनी आरोपींनी डिफॉल्ट ( वैधानिक ) जामीन अर्ज दाखल केला. त्यानंतर ई डीने सकाळी ११. १५ वाजता आरोपपत्र दाखल केले. त्यामुळे दोषारोपपत्रापूर्वीच डिफॉल्ट ( वैधानिक /कसूर केल्याबद्दलचा ) जामीन अर्ज दाखल करण्यात आला होता. दोषारोपपत्र / अंतिम अहवाल दाखल होण्यापूर्वी आरोपींना वैधानिक जामीन मिळण्याचा अधिकार लाभला, तर अशा कोणत्याही त्यानंतर केलेल्या दाखील्यामळे तो अधिकार बाधित होणार नाही किंवा संपुष्टात येणार नाही. कलम १६७ सी आर पी सी अंतर्गत निर्धारित ६० / ९० दिवसांच्या रिमांड कालावधीची गणना दंडाधिकाऱ्यांनी रिमांड (कोठडी ) मंजूर केलेल्या तारखेपासून केली जावी. रिमांडचा पहिला दिवस वगळल्यास रिमांडचा ६०/९० दिवसांचा कालावधी परवानगीपेक्षा अधिक वाढेल आणि कलम १६७ सी आर पी सी अंतर्गत निर्धारित केलेल्या कोठडीच्या कालावधीपेक्षा जास्त होईल. जर ६१/९१ व्या दिवशी किंवा त्यानंतर दोषारोपपत्र / अंतिम अहवाल दाखल केला तर आरोपी हा कसूर झाल्याच्या कारणास्तव जामिनास पात्र ठरेल. ६०/९० दिवसांची कोठडीची मुदत संपुष्टात येताच आरोपीला डिफॉल्ट ( वैधानिक ) जामिनाचा शून्य करणीय नसलेला अधिकार मिळतो. [परिच्छेद ५०] [९४७-जी; ४८- ए-डी]

१.९ उच्च न्यायालयाने कलम १६७ (२) परंतुक (अ) (२) मधील तरतुदी लागू करून उतरवादीना जामीन मंजूर करण्याचा आक्षेपित आदेश हा योग्य असल्याचे आढळून आले आहे.

**त्यामुळे उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांनी दिलेला निर्णय उचलून धरून कायम ठेवण्यात आला आहे. [परिच्छेद ५१] [९४८-ई]**

एम.पी. विरुद्ध रुस्तम आणि इतर **१९९५ (पु.) ३ एस सी सी 221 - अविचारी न्यायनिर्णय**

छगंती सत्यनारायण विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य **(१९८६) ३ एस सी सी १४१ : [१९८६] २ एस सी आर ११२८ - यावर अवलंबून आहे.**

रवी प्रकाश सिंह विरुद्ध बिहार राज्य **(२०१५) ८ एस सी सी ३४० : [२०१५] २ एस सी आर २४१**; एम. रवींद्रन विरुद्ध गुप्तचर अधिकारी, महसूल गुप्तचर संचालक **(२०२१) २ एस सी सी ४८५**; सी बी आय विरुद्ध अनुपम जे. कुलकर्णी **(१९९२) ३ एस सी सी १४१ : [१९९२] ३ एस सी आर १५८**; राज्य सरकार विरुद्ध मो. अशरत भट **(१९९६) १ एस सी सी ४३२ : [१९९५] ६ पु. एस सी आर ३००** ; महाराष्ट्र राज्य विरुद्ध भारती चंदमल वर्मा **(२००२) २ एस सी सी १२१ : [२००१] ५ पु. एस सी आर ४२२**; गौतम नवलखा वि. राष्ट्रीय अन्वेषण एजन्सी **२०२१ एस सी सी ऑनलाइन एससी ३८२**; अस्लम बाबालाल देसाई विरुद्ध महाराष्ट्र राज्य **(१९९२) ४ एस सी सी २७२ : [१९९२] १ पु. एस सी आर ५४५**; एन. सूर्या रेड्डी विरुद्ध ओरिसा राज्य **१९८५ फौ. एल जे ९३९ (मूळ )**; प्रज्ञासिंह ठाकूर विरुद्ध महाराष्ट्र राज्य **(२०११) १० एस सी सी ४४५: [२०११] १४ एस सी आर ६१७**; एस.कासी विरुद्ध राज्य **(२०२०) एस सी सी ऑनलाइन एससी ५२९**; दीपक सत्यवान कुडाळकर विरुद्ध महाराष्ट्र राज्य **मनू/एमएच/०८४३/ २०२० एलडी / वीसी**; राजू उर्फ राज किशोर सिंह विरुद्ध बिहार राज्य **(१९८०) १ एस सी सी १०८**; राजकुमार विरुद्ध पंजाब राज्य **एआयआर १९७९ पी अँड एच ८०**; बटना राम विरुद्ध एच.पी.राज्य **१९८० सीआरएल एलजे ७४८ (एच पी)**; जगदीश विरुद्ध

एमपी राज्य **१९८४ सीआरएल एलजे ७९ (मध्यप्रदेश)**; ए. आर. अंतुले विरुद्ध आर. एस. नायक **(१९८८) २ एस सी सी ६०२ : [१९८८] एस.सी.आर. १;** शाह फैजल विरुद्ध भारत सरकार **(२०२०) ४ एस सी सी १ : [२०२०] ३ एस सी आर १११५**; संदीप कुमार बाफना विरुद्ध महाराष्ट्र राज्य **२०१४ (१६) एस सी सी ६२३ : [२०१४] ४ एस सी आर ४८६**; इकॉन अंतरी लिमिटेड विरुद्ध रोम इंडस्ट्रीज **(२०१४) ११ एस सी सी ७६९ : [२०१३] १४ एस सी आर ७४**; साकेत इंडिया लिमिटेड विरुद्ध इंडिया सिक्युरिटीज लिमिटेड **(१९९९) ३ एस सी सी १ : [१९९९] १ एस सी आर ९६३**; राकेश कुमार पॉल विरुद्ध आसाम राज्य **(२०१७) १५ एस सी सी ६७ : [२०१७] ८ एस सी आर ७८५**; भारत संघ विरुद्ध निराला यादव **(२०१४) ९ एस सी सी ४५७ : [२०१४] ६ एस सी आर १४८**; उदय मोहनलाल आचार्य विरुद्ध महाराष्ट्र राज्य **(२००१) ५ एस सी सी ४५३ : [२००१] २ एस सी आर ८७८**; संजय दत्त विरुद्ध मुंबई सी बी आय मार्फत **१९९४ (५) एस सी सी ४१० : [१९९४] ३ पु. एस सी आर २६३**; बिक्रमजीत सिंग विरुद्ध पंजाब राज्य **(२०२०) १० एस सी सी ६१६**; ए. के. गोपालन विरुद्ध मद्रास राज्य, **ए आय आर १९५० एससी २७ : [१९५०] एस सी आर ८८**; रुस्तम कावसजी कूपर विरुद्ध भारत सरकार **(१९७०) १ एस सी सी २४८ : [१९७०] ३ एस सी आर ५३०**; मनेका गांधी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया **एआयआर १९७८ एससी ५९७ : [१९७८] २ एस सी आर ६२१**; केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य **(१९७३) ४ एस सी सी २२५ : [१९७३] 0 पु. एस.सी.आर.** १; ओल्मस्टेड वि. यू एस , **२७७ यू एस ४३८ (१९२८)**; ए डी एम जबलपुर वि. शिवकांत शुक्ला **(१९७६) २ एस सी सी ५२१ : [१९७६] 0 पु एस सी आर १७२**; के.एस. पुट्टास्वामी विरुद्ध भारत सरकार **(२०१७) १० एस सी सी १ : [२०१७] १० एस सी आर**

**५६९**; मुन्न वि. इलिनॉय, **९४ यू एस ११३ (१८७६)**; खडक सिंग विरुद्ध यूपी राज्य **(१९६४) १ एस सी आर ३३२**; फ्रान्सिस कोरली मुलिन विरुद्ध प्रशासक, **१९८१ ए आय आर ७४६ - संदर्भित.**

व्ही.एम. बचल, इंडियन जर्नल ऑफ पॉलिटिकल सायन्स, **खंड २५, क्र.३/४ (जुलै-सप्टेंबर दिसंबर, १९६४), पृष्ठ २३१-२४०**; जॉन लॉक यांचा 'सेकंड ट्रिटी ऑफ गव्हर्नमेंट' – **याचा संदर्भ घेतला.**

**<u>केस लॉ संदर्भ</u>**

| | | |
|---|---|---|
| **[२०१५] 2 एस सी आर २४१** | **परि. ७** | **चा संदर्भ** |
| **(२०२१) २ एस सी सी ४८५** | **परि. ७** | **चा संदर्भ** |
| **[१९८६] 2 एस सी आर ११२८** | **परि. ८** | **चा संदर्भ** |
| **[१९९२] 3 एस सी आर १५८** | **परि. ८** | **चा संदर्भ** |
| **[१९९५] ६ पु. एस.सी.आर. ३००** | **परि. ८** | **चा संदर्भ** |
| **[२००१] ५ पु. एस सी आर ४२२** | **परि. ८** | **चा संदर्भ** |
| **[१९९२] १ पु. एस सी आर ५४५** | **परिच्छेद १७.१** | **चा संदर्भ** |
| **[२०११] १४ एस सी आर ६१७** | **परि. १८.१** | **चा संदर्भ** |
| **ए आय आर १९७९ पी आणि एच ८० परि. २५** | | **संदर्भित** |
| **[१९९५] (उपरोल्लेखित ) ३ एस सी सी २२१** | | **परि २९, ३१, ३३** |

**पूर्ण विचार न करता दिलेला निर्णय**

| | | |
|---|---|---|
| [१९८८] १ पु. एस सी आर १ | परि. ३० | चा संदर्भ |
| [२०२०] ३ एस सी आर १११५ | परि. ३० | चा संदर्भ |
| [२०१४] ४ एस सी आर ४८६ | परि. ३० | चा संदर्भ |
| [२०१३] १४ एस सी आर ७४ | परि. ३५ | चा संदर्भ |
| [१९९९] १ एस सी आर ९६३ | परि. ३५ | चा संदर्भ |
| [२०१७] ८ एस सी आर ७८५ | परि. ३७ | चा संदर्भ |
| [२०१४] ६ एस सी आर १४८ | परि. ३७ | चा संदर्भ |
| [२००१] २ एस सी आर ८७८ | परि. ३७ | चा संदर्भ |
| [१९९४] ३ एस सी आर २६३ | परि. ३७ | चा संदर्भ |
| (२०२०) १० एस सी सी ६१६ | परि. ४१ | चा संदर्भ |
| (२०१७) १५ एस सी सी (१०९) | परि. ४३ | चा संदर्भ |
| [१९५०] एस सी आर ८८ | परि. ४३ | चा संदर्भ |
| [१९७०] ३ एस सी आर ५३० | परि. ४३ | चा संदर्भ |
| [१९७८] २ एस सी आर ६२१ | परि. ४३ | चा संदर्भ |
| [१९७३] 0 पु. एस सी आर १ | परि. ४५ | चा संदर्भ |

| | | |
|---|---|---|
| **[१९७६]० पु. एस सी आर १७२** | **परि. ४५** | **चा संदर्भ** |
| **[२०१७]१० एस सी आर ५६९** | **परि. ४५** | **चा संदर्भ** |
| **(१९६४) १ एस सी आर ३३२** | **परि. ४७** | **चा संदर्भ** |
| **१९८१ ए आय आर ७४६** | **परि. ४७** | **चा संदर्भ** |

फौजदारी अपील अधिकार क्षेत्र **:** फौजदारी अपील ७०१ **-** ७०२ **/** २०२०

मुंबई उच्च न्यायालयाच्या जामीन अर्ज क्रमांक एच डी व्ही सी ४०० आणि ४०१ / २०२० यामधील दिनांक २०. ०८. २०२० च्या न्यायनिर्णय व आदेशावरून

तुषार मेहता, सॉलिसिटर जनरल (महान्याय - अभिकर्ता ), एस. व्ही. राजू, संजय जैन, अति. महान्याय - अभिकर्ता, मुकेश कुमार मरोरिया, कानू अग्रवाल, राजन कुमार चौरसिया , अन्नम व्यंकटेश, श्रीमती सायरिका राजू, अर्कज कुमार, जोहेब हुसेन, अपीलकर्ता यांचे वकील

कपिल सिब्बल, मुकुल रोहतगी, अमित देसाई, वरिष्ठ वकील महेश अग्रवाल, अंकुर सहगल, रोहन दक्षिणी, शुभम कुलश्रेष्ठ,कौस्तुभ सिंह, श्रीमती कामाक्षी सहगल, श्रीमती पूजा कोठारी, श्रीमती उर्वी गुप्ते, श्रीमती काजल दलाल, श्रीमती आकांक्षा सक्सेना, ई. सी. अग्रवाल, श्रीरंग बी. वर्मा, सिद्धार्थ धर्माधिकारी, आदित्य अनिरुद्ध पांडे, भरत बागला, श्रीमती कीर्ती दाधीच, सारदकुमार सिंघानिया, अमित के. नैन, उत्तरवादी यांचे वकील

न्यायालयाचा निर्णय यांच्याद्वारे देण्यात आला.

**हृषीकेश रॉय, न्या .**

१. जॉन लॉक यांनी आपल्या 'टू ट्रिटीज ऑफ गव्हर्नमेंट' (१६८९)[1] या ग्रंथात वैयक्तिक स्वातंत्र्यावर भर दिला आणि त्यांनी म्हटले आहे की, "कायद्याचा शेवट हा नष्ट करणे किंवा संयमित करणे असा नाही, परंतु स्वातंत्र्याचे रक्षण करणे आणि त्याची कक्षा रुंदावणे आहे. सर्व प्राणिमात्रांमध्ये कायद्याची व्यवस्था आहे आणि जिथे कोणताही कायदा नाही,तेथे स्वातंत्र्य नाही.

२. सध्याच्या प्रकरणात आम्ही अशा आरोपींच्या हक्कांची चर्चा करतो, ज्यांचा डिफॉल्ट ( वैधानिक / कसूर केल्याच्या कारणास्तव) जामीन मिळण्याचा अधिकार एका दिवसाच्या किंवा त्याहूनही कमी फरकाने असणाऱ्या कालावधीच्या कारणास्तव अधांतरी लटकतो आहे. साहजिकच, सर्वसामान्यपणे हे नगण्य आहे असे समजले जाऊ शकते. तथापि, या प्रकरणाचा घटनात्मक आयाम असा आहे, की व्यक्ती स्वातंत्र्य हे फक्त कायद्याने प्रस्थापित केलेल्या यथोचित आणि न्याय्य प्रक्रियेद्वारेच हिरावून घेतले जाऊ शकते आणि त्याचे विश्लेषण आणि संरक्षण करणे आवश्यक आहे. खरे तर हा मुद्दा असा आहे की, जो सांगायला अतिशय सोपा परंतु त्याचे उत्तर देणे कठीण आहे. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (यानंतर उल्लेख 'सी आर पी सी ') च्या कलम १६७ (२) च्या पहिल्या तरतुदीनुसार कोठडीच्या कालावधीमध्ये दंडाधिकाऱ्यांनी कोठडीचा आदेश देणाऱ्या दिवसाचा समावेश यात आहे का, याचे उत्तर न्यायालयाने देणे आवश्यक आहे. निकाल काहीही असो, कायदेशीर अधिकाराशिवाय कोणालाही तुरुंगवास भोगावा लागू नये, याची जाणीव या न्यायालयाला आहे. गुन्हेगारी रोखणे आणि सुरक्षितता राखणे हे राज्याचे काम असले, तरी त्यासाठी वैयक्तिक स्वातंत्र्य तारण नसावे.

1 जॉन लॉक 'टू ट्रिटीज ऑफ सिव्हील गव्हर्नमेंट' डिसेंबर १६८९

३. आम्ही अपीलकर्त्यांच्या वतीने भारताचे विद्वान अतिरिक्त महान्याय-अभिकर्ता श्री एस. व्ही. राजू यांचे म्हणणे ऐकले आहे. उच्च न्यायालयाने डिफॉल्ट ( वैधानिक ) जामिनाचा लाभ दिलेल्या उत्तरवादीची बाजू मुकुल रोहतगी, कपिल सिब्बल आणि अमित देसाई या वरिष्ठ वकिलांनी मांडली.

४. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (सीआरपीसी) कलम १६७ (२) चे परंतुक (अ) (२) अन्वये उतरवादींना वैधानिक जामीन मंजूर करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या २०.०८.२०२० च्या आदेशाविरुद्ध हे अपील निर्देशित करण्यात आले आहे. उतरवादींना १४.०५.२०२० रोजी आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक अधिनियम, २००२ च्या कलम ३ (यापुढे 'पीएमएलए') अन्वये कथित गुन्हा केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती आणि त्याच तारखेला त्यांना कोठडी सुनावण्यात आली होती. दिनांक ११.०७.२०२० रोजी ई-मेलद्वारे, अंमलबजावणी संचालनालयाने (यापुढे 'ईडी') तक्रार दाखल करण्याचा दावा केला आणि त्यानंतर १३.७.२०२० रोजी, म्हणजे सोमवारी त्याची प्रत्यक्ष प्रत न्यायालयासमोर सादर करण्यात आली. जामीन वाढवण्याचे अर्ज दिनांक १३.०७.२०२० रोजी सकाळी ८.५३ वाजता सकाळी ११ वाजेपर्यंत ई-मेल द्वारे सादर करण्यात आले आणि प्रत्यक्ष दाखल केल्याचे टोकन सकाळी ११ वाजेपर्यंत जारी करण्यात आले.

५. रिमांडच्या तारखेपासून म्हणजेच १४.०५.२०२० पासून ६० दिवसांचा कालावधी १२.०७.२०२० (रविवार) रोजी संपला आणि दुसऱ्या दिवशी वैधानिक जामीन अर्ज न्यायालयात सादर करण्यात आले, असे उत्तरवादींनद्वारे ठामपणे सांगण्यात आले. मात्र, ६० दिवसांचा

कालावधी १५.०५.२०२० रोजी सुरू होईल, असे मत मांडत त्यानुसार रिमांडची तारीख (म्हणजे १४.५.२०२०) वगळून विशेष न्यायाधीशांनी उत्तरवादींना वैधानिक जामीन नाकारला मात्र, ६० दिवसांचा कालावधी मोजताना रिमांडची तारीख वगळणे चुकीचे आहे, असे उच्च न्यायालयाला आक्षेपित आदेशा अन्वये वाटले आणि १३.७.२०२० रोजी म्हणजे ६१ व्या दिवशी ईडीने दोषारोपपत्र दाखल केल्यास उतरवादींना वैधानिक जामीन मिळण्याचा हक्क देईल, असे मत व्यक्त केले. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाला या न्यायालयाने ३.९.२०२० रोजी स्थगिती दिली होती.

**वादप्रश्न आणि संदर्भ**

६. वैधानिक जामिनाच्या दाव्याचा विचार करताना, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६७ (२) च्या परंतुक (अ) मध्ये विचार केलेल्या ६०/९० दिवसांच्या कालावधीची गणना करताना रिमांडची तारीख समाविष्ट करायची की वगळायची, हा विचारकरण्याजोगा मुख्य मुद्दा निर्माण होत आहे. या विवाद्य प्रश्नाचा विचार या न्यायालयाने विविध प्रकरणांमध्ये केला आहे, परंतु आरोपीला मिळणाऱ्या वैधानिक जामिनाच्या हक्कासाठी विहित कालावधी कसा मोजावा, याबाबत मतभिन्नता आहे. काही न्यायनिर्णय रिमांडची तारीख वगळण्याच्या बाजूने अनुकूलता दर्शवतात, तर काही प्रकरणांमध्ये उलट भूमिका घेतली आहे.

७. एम.पी. राज्य विरुद्ध रुस्तम आणि इतर[2] या प्रकरणातील युक्तिवादाच्या धर्तीवर अभियोग पक्ष अवलंबून आहे. त्यानंतर रवी प्रकाश सिंह विरुद्ध बिहार राज्य[3] आणि एम. रवींद्रन विरुद्ध गुप्तवार्ता अधिकारी, संचालक महसूल गुप्तचर विभाग[4] या खटल्यत त्याचे अनुसरण

2 १९९५ (पुरवणी) ३ एससीसी २२१
3 (२०१५) ८ एससीसी ३४०
4 (२०२१) २ एससीसी ४८५

करण्यात आल. ज्यात वैधानिक जामिनाचा अधिकार निर्माण होण्यासाठी निर्धारित ६०/९० दिवसांचा कालावधी मोजण्यासाठी रिमांडची तारीख वगळण्यात यावी, असे[1] मत व्यक्त करण्यात आले होते.

८. दुसरीकडे, आरोपीने त्याला वैधानिक जामीनाच्या हक्कासाठी पात्र ठरवण्यासाठी रिमांडचा कालावधी मोजण्यासाठी रिमांडची पहिली तारीख समाविष्ट करावी असा युक्तिवाद करताना इतर गोष्टींसह **छगंती** सत्यनारायण विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य[5], सीबीआय विरुद्ध अनुपम जे. कुलकर्णी[6], राज्य वि. मोह. अश्रफ भट[7] आणि महाराष्ट्र राज्य विरुद्ध भारती चांदमल वर्मा[8] यावर भरवसा ठेवला आहे

९. वरील विधीसंघर्षामुळे न्यायालयीन पेच निर्माण झाला असून तो या संदर्भात सोडविणे आवश्यक आहे. छगंती (उपरोल्लेखित) या प्रकरणात या न्यायालयाने वैधानिक रिमांडच्या कालावधीत तपास पूर्ण करण्यासंदर्भात वैधानिक हेतू तपासताना रिमांड आदेशाच्या दिवसाचा समावेश करावा, असे मत नोंदवले. दुसरीकडे, एम. रवींद्रन (उपरोल्लेखित) या प्रकरणातील ३-न्यायाधीशांच्या न्यायपीठाने रवी प्रकाश (उपरोल्लेखित) वर अवलंबून राहून ज्याने रुस्तम (उपरोल्लेखित) मध्ये नमूद केलेल्या तत्त्वाचे पालन केले आणि आरोपीच्या वैधानिक जामिनाच्या अधिकार सुलभ करण्यासाठी ६०/९० दिवसांच्या अनिवार्य कालावधीची गणना करण्यासाठी कोठडीची तारीख वगळावी असे घोषित केले.

5 (१९८६) ३ एससीसी १४१
6 (१९९२) ३ एससीसी १४१
7 (१९९६) १ एससीसी ४३२
8 (२००२) २ एससीसी १२१

१०. छगंती या प्रकरणामध्ये घोषित केलेल्या कायद्याच्या पूर्वीच्या स्थितिकडे रुस्तम या प्रकरणात दुर्लक्ष करण्यात आले आणि नंतर रुस्तम हा रवी प्रकाश आणि त्यानंतर रवींद्रन या प्रकरणांमध्ये मध्ये निर्धारित कालावधीतून रिमांडची तारीख वगळण्याचा आधार बनला, जो तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाचा ताजा निर्णय आहे, त्यामुळे योग्य संख्येच्या न्यायधीशांच्या न्यायपीठाने पूर्वोदाहरणे आणि त्यातील संभ्रम लक्षात घेऊन कायद्या प्रस्थापित करणे आवश्यक ठरते. जोपर्यंत हा प्रश्न सोडवता येत नाही, तोपर्यंत अंतिमत: मूलभूत अधिकार[9] असलेल्या वैधानिक जामिनाच्या हक्काचे रक्षण कसे करायचे, याबाबत मतभिन्नता निर्माण होतील.

११. या न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या न्यायपीठाने २३.२.२०२१ रोजी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६७ (२) चे परंतुक (अ) अन्वये ६०/९० दिवसांच्या रिमांड कालावधीच्या मोजणीबाबत कायद्यातील तफावत लक्षात घेऊन हा प्रश्न या तीन न्यायाधीशांच्या न्यायपीठाकडे पाठवीला. येथील उत्तरामुळे वैधानिक जामिनाच्या अधिकाराच्या मुद्द्यावर एकसमान कायदा लागू करणे सुलभ होईल. संदर्भाचे उत्तर पुढीलप्रमाणे दिले जात आहे :-

## तथ्यात्मक पार्श्वभूमी

१२. सीबीआयने नोंदवलेल्या आरसी क्रमांक २१९/२०२० मध्ये १०.०५.२०२० पासून न्यायालयीन कोठडीत परिरुद्ध असलेल्या दोन्ही उतरवादींना आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक अधिनियम कलम ३ अंतर्गत कथित गुन्हा केल्याबद्दल अंमलबजावणी संचालयाने नोंदवलेल्या ईसीआयआर /एमबीझेडओ-आय/३/२०२० मध्ये आरोपी म्हणून न्यायालयसामोर आणण्यात

9 गौतम नवलखा वि. राष्ट्रीय अन्वेषन अभिकरण, २०२१ एससीसी ऑनलाइन एससी ३८२

आले. दिनांक १४.५.२०२० रोजी अर्जदारांना माननीय विशेष न्यायालय, मुंबई येथे हजर करण्यात आले आणि त्यानंतर त्यांना पोलिस कोठडीत पाठवण्यात आले व त्यानंतर २७.५.२०२० रोजी त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली. उच्च न्यायालयाने अर्जदारांना वैधानिक जामीन मंजूर करताना निर्णयासाठी खालील प्रश्न तयार केला.

"फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६७ (२) चे परंतुक (अ) मध्ये विचार केल्यानुसार ६० किंवा ९० दिवसांच्या रिमांड कालावधीची गणना करताना रिमांडचा दिवस समाविष्ट करावा किंवा वगळावा लागेल".

१३. अर्जदारांनी उच्च न्यायालयासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांना १४.०५.२०२० रोजी अटक करण्यात आली होती आणि त्याच दिवशी त्यांना दंडाधिकाऱ्यांनी कोठडी सुनावली आणि तसे रिमांडचे आदेश वेळोवेळी देण्यात आले. अंमलबजावणी संचालनालयाच्या म्हणण्यानुसार, ११.०७.२०२० रोजी (म्हणजे शनिवारी) त्यांनी ई-मेलद्वारे तक्रार दाखल केली होती आणि अर्जदारांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला होता की हे फक्त पुढे पाठवला, परंतु संपूर्ण तक्रार नाही. १३.०७.२०२० रोजी म्हणजेच सोमवारी अंमलबजावणी संचालनालयाने न्यायालयासमोर प्रत्यक्ष तक्रार दाखल केली, या तथ्यांच्या आधारे अर्जदारांच्या वकिलांनी सांगितले की, अर्जदारांच्या रिमांडच्या तारखेपासून (१४.०५.२०२०) ६० दिवसांची मुदत १२.०७.२०२० (रविवार) रोजी संपली आणि अर्जदारांनी १३.०७.२०२० रोजी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६७ (२) च्या परंतुक (अ) (२) अन्वये वैधानिक जामिनावर मुदतवाढ मागितली. सुरवातीला हे अर्ज ई-मेलद्वारे पुढे सुमारे सकाळी ८.५३ वाजता पाठविण्यात आले

आणि सुमारे दोन तासांनंतर १३.०७.२०२० रोजी सकाळी ११ वाजता सत्र न्यायालयात प्रत्यक्ष दाखल करण्यासाठी जामीन अर्ज सादर करण्यात आले आणि अर्ज दाखल केल्याची पावती देणारे टोकन देण्यात आले आणि अर्जाना क्रमांकही देण्यात आले होते.

१४. अंमलबजावणी संचालनालयाने ११.७.२०२० रोजी ई-मेलद्वारे तक्रार दाखल केल्याचा दावा केला आणि त्यानंतर १३.७.२०२० रोजी प्रत्यक्ष अर्ज केला. अंमलबजावणी संचालनालयानच्या म्हणण्यानुसार, रुस्तम (उपरोल्लेखित) या प्रकरणावर भिस्त ठेऊन ६० दिवसांची मुदत १३.०७.२०२० रोजी संपेल (ज्यामध्ये रिमांडची तारीख म्हणजे १४.०५.२०२० वगळण्याची मागणी केली आहे). त्यामुळे अंमलबजावणी संचालनालयनानुसार वेळेत तक्रार दाखल करण्यात आल्याचे म्हणटले आहे.

१५. तक्रार दाखल करण्याची ६० दिवसांची मुदत संपल्याचे समजून विद्वान विशेष न्यायालयाने १४.७.२०२० रोजी वैधानिक जामीन नाकारला. रिमांडची तारीख वगळावी लागेल आणि १५ मे २०२० पासून ६० दिवसांचा कालावधी मोजावा लागेल, असे मत विद्वान न्यायाधीशांनी व्यक्त केले. या युक्तिवादाने जामीन अर्ज फेटाळण्यात आला.

१६. उतरवादींनी त्यांचे वैधानिक जामीन अर्ज फेटाळलयामुळे दिलेल्या आव्हानावर, उच्च न्यायालयाने प्रतिस्पर्धीच्या सादर निवेदानाच्या अभिप्रेत अर्थाचे विश्लेषण केल्यानंतर आणि कायदेशीर तरतुदी आणि त्यांच्या अर्जांचे प्रकरणातील वस्तुस्थितीशी अर्थ लावल्यानंतर असा निष्कर्ष काढला की, विद्वान विशेष न्यायाधीशांनी ६० दिवसांच्या कालावधीची गणना करताना रिमांडची तारीख चुकीच्या पद्धतीने वगळली. अंमलबजावणी संचालनालयाने

१३.०७.२०२० रोजी दोषारोपपत्र दाखल केले होते, रिमांडचा दिवस म्हणजे १४.०५.२०२० चा समावेश करून ६० दिवसांपेक्षा जास्त असल्याने अर्जदार वैधानिक जामिन मिळण्यास पात्र असल्याचे आढळले. त्यानुसार फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६७ (२) मधील तरतुदींचा उल्लेख आरोपी व्यक्तीनि जामीनपत्र देण्याच्या अधीन उत्तरवादींची सुटका करण्याचे निर्देश देण्यात आले होते. उच्च न्यायालयाच्या या आदेशाला सध्याच्या अपिलात आव्हान देण्यात आले आहे.

## वकिलांचा युक्तिवाद

१७.१ दिनांक २०.०८.२०२० च्या न्यायनिर्णयाच्या वैधतेवर तीव्र प्रहार करताना, विहीत ६०/९० दिवसांच्या रिमांड कालावधीच्या मोजणीसाठी रिमांड कालावधीच्या दोन्ही बाजूंपैकी एक दिवस वगळावा लागतो आणि सध्याच्या प्रकरणात वैधानिक जामिनासाठी पात्रता मोजण्यासाठी रिमांडची तारीख म्हणजेच १४.५.२०२० किंवा ६० वा दिवस म्हणजेच १२.०७.२०२० वगळणे आवश्यक आहे, असा युक्तिवाद विद्वान अतिरिक्त महान्यायअभीकर्ता एस. व्ही. राजू यांनी केला. अंमलबजावणी संचालनालयानच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ श्री राजू, अस्लम बाबालाल देसाई विरुद्ध महाराष्ट्र राज्य[10], मध्य प्रदेश राज्य विरुद्ध रुस्तम (उपरोल्लेखित) आणि रवी प्रकाश सिंह ऊर्फ अरविंद सिंह विरुद्ध बिहार राज्य (उपरोल्लेखित) या प्रकरणांवर इतर गोष्टींसह ठामपणे अवलंबून राहतील.

१७.२ फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६७ (२) च्या पहिल्या परंतुकानुसार विहित ६० दिवसांचा कालावधी १२.७.२०२० रोजी संपला, तरीही एक पर्यायी युक्तिवाद असा करण्यात येतो

10 (१९९२) ४ एससीसी २७२

की, त्याच दिवशी रविवार असल्याने सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमाच्या कलम १० च्या तरतुदी आपले कार्य करू लागतील आणि अशाप्रकारे रविवारी संपलेली ६० दिवसांची मुदत सोमवारपर्यंत म्हणजेच १३.७.२०२० पर्यंत वाढविली जाईल. अशा युक्तिवादाच्या समर्थनार्थ श्री. राजू यांनी एन. सूर्या रेड्डी विरुद्ध ओरिसा राज्य[11] या प्रकरणावर भरवसा ठेवला आहे.

१७.३ विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्ता यांनी असा अतिरिक्त युक्तिवाद केला की फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६७ (२) च्या पहिल्या परंतुका अन्वये वैधानिक जामिनाचा कालावधी मोजण्यासाठी उच्च न्यायालय छगंती (उपरोल्लेखित) प्रकरणाच्या प्रमाणावर चुकीच्या रीतीने अवलंबून राहिले. अटकेची तारीख रिमांडच्या तारखेइतकीच असल्याने विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्त्याच्या म्हणण्यानुसार छगंती (उपरोल्लेखित) मधील प्रमाणाला लागू होत नाही आणि म्हणूनच उच्च न्यायालयाने सध्याच्या वस्तुस्थितीत चुकीच्या पद्धतीने लागू केला आहे.

१८.१ दुसऱ्या बाजूस, श्री. मुकुल रोहतगी, श्री कपिल सिब्बल आणि श्री. अमित देसाई, उतरवादींचे वरिष्ठ वकील, असा युक्तिवाद करतात की फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६७ (२) च्या परंतुक (अ) अंतर्गत विचार केलेल्या कालावधीची गणना रिमांड आदेशाच्या तारखेपासून करावी आणि आरोपींना न्यायालयात हजर केल्याचा पहिला दिवस वगळणे युक्तिवादला सोडून असेल. वकिलांनी त्यांच्या युक्तिवादासाठी छगंती (उपरोल्लेखित) मधील प्रमाणाचा आधार घेतला आहे, जे सीबीआय विशेष तपास कक्ष, नवी दिल्ली विरुद्ध अनुपमा कुलकर्णी

11 १९८५ क्रि. एलजे. ९३९ (ओरि)

(उपरोल्लेखित), प्रज्ञा सिंह ठाकूर वि. महाराष्ट्र राज्य[12] सारख्या नंतरच्या अनेक न्यायनिर्णयात मान्य केले. उत्तरवादीनचे वकील देखील राज्य वि. मोहम्मद अश्रफ भट (उपरोल्लेखित), एस. काशी वि. राज्य[13] आणि गौतम नवलखा वि. एनआयए (उपरोल्लेखित) मधील निर्णयावर अवलंबून आहेत.

**चर्चा**

१९ . आक्षेपित न्यायनिर्णयात मुंबई उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांनी मान्यतेसह, दीपक सत्यवान कुडाळकर विरुद्ध महाराष्ट्र राज्य[14], मधील समन्वय न्यायपीठाच्या निकालाचा उल्लेख केला होता, जेथे वैधानिक जामिनासाठी लागू असलेले सर्वोच्च न्यायालयाचे सर्व पूर्वीचे निकाल विचारात घेतले आणि विश्लेषण केले गेले. न्या. प्रकाश डी. नाईक ज्यांनी खालील परिच्छेदामध्ये फौजदारी प्रक्रिया संहितेच्याच्या लागू तरतुदींचे विश्लेषण केले होते, त्यांनी लिहिलेल्या मताचा आम्हाला फायदा होऊ शकतो.

> "७. उपरोक्त तरतुदीचा (फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६७) चे अवलोकन केल्यावर असे दिसून येईल की, पोट-कलम (१) ही अनिवार्य तरतूद आहे, ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीला अटक केली जाते आणि कोठडीत ठेवले जाते आणि जेव्हा असे दिसते की कलम ५७ द्वारे निश्चित केलेल्या चोवीस तासांच्या कालावधीत तपास पूर्ण करता येणार नाही, तेव्हा पोलीस अधिकाऱ्याने काय करावे त्याच नियमन करत. पोट-कलम (२) दंडाधिकाऱ्याकडे उपलब्ध रिमांडच्या अधिकारांशी संबंधित आहे आणि

12 (२०११) १० एससीसी ४४५

13 (२०२०) एससीसी ऑनलाइन एससी ५२९

14 मनु/एमएच/०८४३/२०२०; एलडी/वीसी फौजदारी जामिन अर्ज १९७/२०२०

अशा अधिकारांचा वापर कोणत्या पद्धतीने केला जावा. कलम १६७ च्या पोटकलम (१) ची संज्ञा कलम ५७ च्या बरोबर वाचावी . हे स्पष्ट आहे की कलम ५७ कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याला एखाद्या व्यक्तीला वॉरंटशिवाय चोवीस तासापेक्षा जास्त कालावधीसाठी दंडाधिकाऱ्यासमोर हजर केल्याशिवाय, अटकेच्या स्थळापासून दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासासाठी घेतलेला वेळ चोवीस तासाच्या विहित वेळेतून वगळता येऊ शकेल या अपवादाच्या अधीन, कोठडीत ठेवण्यास मनाई करत. पोटकलंम (१) अशी तरतूद करत की, कलम ५७ द्वारे निश्चित केल्यानुसार चोवीस तासांच्या कालावधीत अन्वेषण पूर्ण होऊ शकत नसेल तर आरोपीला डायरीतील नोंदीसह दंडाधिकाऱ्याकडे पाठवावे लागते. याचा अर्थ असा आहे की, अटक केलेल्या व्यक्तीला अन्वेषणाच्या उद्देशाने जास्तीत जास्त चोवीस तासाच्या कोठडीत ठेवण्याचा पोलिस अधिकाऱ्याला अधिकार आहे. म्हणून, अटक केलेल्या व्यक्तीच्या कोठडीचा प्रारंभिक कालावधी, जोपर्यंत त्याला दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले जात नाही, उल्लेख करण्यासारखा नसतो किंवा तो दंडाधिकाऱ्याने पारित केलेल्या रिमांडच्या आदेशाप्रमाणे नसतो. कलम १६७ च्या पोटकलम (१) नुसार आरोपीला त्याच्यासमोर हजर केल्यानंतर दंडाधिकाऱ्याला दिलेले रिमांडचे अधिकार वापरण्यायोग्य होतात. कलम १६७ मधील पोटकलम (१) ही प्रक्रिया समाविष्ट करते आणि असेही नमूद करते की, पोलिस अधिकाऱ्याने आरोपीला जवळच्या दंडाधिकाऱ्याकडे पाठवताना प्रकरणाशी संबंधित डायरीमधील नोंदींची एक प्रत

देखील पाठविली पाहिजे. डायरीतील नोंदी म्हणजे दंडाधिकाऱ्याला आवश्यक ती माहिती मिळवून देणे ज्यावर तो आरोपीला कोठडीत ठेवायचे की नाही याचा निर्णय घेऊ शकतो. ज्या प्रकरणात आरोपीला अत्यंत तत्परतेने अटक किंवा स्थानबद्ध केलेले असते अशा प्रकरणात कायदा तपास करणाऱ्या अभिकरणाला तपास करण्यास आणि विहित कालावधीत तपास तातडीने पूर्ण करण्यास हुकूम करत. पोट-कलम (२ ) चे परंतुक बाह्य मर्यादा निश्चित करत, ज्या मर्यादेच्या आत अन्वेषण पूर्ण करायचं असतं आणि जर ते विहित कालावधीत पूर्ण झाले नाही तर, आरोपीला जामिनावर मुक्त होण्याचा अधिकार प्राप्त होईल आणि तो जमीन देण्यास तयार असल्यास आणि त्याने जामीन दिल्यास, दंडाधिकारी त्याला जामिनावर सोडतील आणि अशी सुटका फौजदारी प्रक्रिया संहितेच्या प्रकरण ३३ अंतर्गत जामीन मंजूर केला आहे असे मानले जाईल. १९७८ च्या अधिनियम क्रमांक ४५ द्वारे समाविष्ट केलेली तरतूद, जिथे दंडाधिकाऱ्यांना योग्य वाटते की पंधरा दिवसांच्या कालावधीपेक्षा अधिक काळ स्थानबद्धतेत ठेवणे आवश्यक आहे आणि ते असे नमूद करते की, १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीच्या पोलिस कोठडी पेक्षा अन्यथा दंडाधिकारी आरोपी व्यक्तीला स्थानबद्धतेत घेण्यास अधिकृत करू शकतात. . कलम १६७ (२) च्या परंतुका मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, ज्या प्रकरणांचा तपास त्यात नमूद केलेल्या गंभीर गुन्ह्यांशी संबंधित आहे अशा प्रकरणांमध्ये स्थानबद्धतेचा एकूण कालावधी नव्वद दिवसांपेक्षा जास्त नसावा आणि इतर प्रकरणांमध्ये साठ दिवसांपेक्षा जास्त नसावा

आणि ही मुदत संपल्यानंतर त्या वेळेपर्यंत दोषारोपपत्र दाखल केले नसेल तर आरोपींची जामिनावर सुटका केली जाईल.”

२०. आक्षेपित न्यायनिर्णयात संदर्भित केलेली पूर्वोदाहरणे आणि दीपक सत्यवान (उपरोल्लेखित) या प्रकरणामधील समन्वय न्यायपीठ असे दर्शविते की, न्यायालय अभियोग पक्षाला संशयितास अटक करण्याचा अधिकार प्रदान करते आणि संहितेअंतर्गत विचारात घेतलेल्या तपासात पुरावे गोळा करण्याच्या कार्यवाहीसह सर्व उपायांचा समावेश असेल आणि अन्वेषण संपल्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७३ अन्वये अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तपास पूर्ण होण्यासाठी कोणतीही स्पष्ट बाह्य मर्यादा नसली तरी अनावश्यक विलंब न करता तपास पूर्ण व्हावा, हा बाराव्या प्रकरणाचा उद्देश आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ (२) अन्वये अंतिम अहवाल दाखल करण् विहित करत, ज्यामुळे न्यायालयाला एखाद्या गुन्ह्याची दखल घेण्याचा अधिकार मिळतो. तसेच ते कलम १७३ चे पोटकलम (८) अन्वये पुढील तपासाची परवानगी देत. तसेच कलम १७३ (४) नुसार, अंतिम अहवाल दाखल झाल्यानंतर एखाद्या आरोपीची जामिनावर सुटका झाली असेल, तर तपासाच्या गुणवत्तेच्या आधारे दंडाधिकारी त्याचे जामीन बंधपत्र रद्द करू शकतात. त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६७ (२) परंतुक (अ) च्या बदल्यात आरोपीला ~~देण्यात~~ येणारे संरक्षण केवळ विहित ६०/९० दिवसांच्या कालावधीच्या संदर्भात आहे, त्यापलीकडे जरी अन्वेषण अपूर्ण असल्यास आरोपीच्या कोठडीची मागणी करता येत नाही.

